N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा — **P.S.(ठाणे):** सिंधखेड राजा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0075 — **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/04/2024 02:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 12/04/2024
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/04/2024
   **Time From (वेळेपासून):** 14:50 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 13/04/2024 — **Time (वेळ):** 01:53 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 001

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/04/2024 01:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 01 किमी — **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय परिसरातील उपकोष, सिंदखेड राजा ,सिंदखेड राजा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): फकिरा पांडुरंग चाटे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1980

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | किनगाव राजा ,सिंदखेड राजा ,किनगाव राजा ,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | किनगाव राजा ,सिंदखेड राजा ,किनगाव राजा ,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सचिन शंकरलाल जैस्वाल | | | 1. तहसील कार्यालय सिंदखेड राजा ,सिंदखेड राजा ,सिंधखेड राजा, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | मंगेश शालीग्राम कुलथे | | | 1. तहसिल कार्यालय सिंदखेड राजा , सिंदखेड राजा , सिंदखेड राजा ,सिंधखेड राजा,बुलढाणा, महाराष्ट्र,भारत |
| 3 | पंजाबराव तेजराव ताठे | | | 1. तहसील कार्यालय सिंदखेड राजा ,सिंदखेड राज,सिंदखेड राज, |

सिंधखेड राजा,बुलढाणा,
महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फकिरा पांडुरंग चाटे, वय ४४ वर्षे, व्यवसाय रेती वाहतुक, रा किनगांवराजा, ता. सिंदखेडराजा, जि बुलढाणा मी समक्ष टंकलिखीत फिर्याद देतो की मी वरिल प्रमाणे असून वर नमुद ठिकाणी कुटुंबासह राहतो माझेकडे एक ट्रॅक्टर व चार बरासचे एक व दोन बरासचे एक टिप्पर असून त्याव्दारे मी रेती घाट सुरु असतांना नियमानुसार रेती वाहतुक करतो परंतु सध्या रेती घाट सुरु नसल्याने माझी वाहने ही माझे शेतात उभी आहेत मला तहसिल कार्यालय सिंदखेडराजा येथील तहसिलदार श्री जैस्वाल साहेब यांचे चालक श्री मंगेश कुलथे यांनी ग्राम निमगांव वायाळ येथे अवैधपणे चालु असलेल्या रेती घाटावरुन अवैधपणे रेती वाहतुक सुरु करण्याकरिता दिनांक 11.04.2024 रोजी तहसिल कार्यालय सिंदखेडराजा येथे भेटण्यासाठी बोलाविल्याने मी दिनांक 11.04.2024 रोजी तहसिल कार्यालय सिंदखेडराजा येथे जावून तहसिलदार श्री जैस्वाल साहेब यांचे चालक श्री कुलथे यांची भेट घेतली असता श्री कुलथे यांनी मला ग्राम निमगाव वायाळ येथे अवैधपणे चालु असलेल्या रेती घाटावरुन ट्रॅक्टरव्दारे रेतीचा उपसा करुन अवैधपणे रेती वाहतुक करु देण्यासाठी तहसिलदार श्री जैस्वाल साहेब यांचेकरिता माझेकडे 35000/- रुपये महिन्याप्रमाणे लाचेची मागणी करित असल्याबाबत दिनांक 11.04.2024 रोजी लाप्रवि बुलढाणा घटकाकडे लेखी तक्रार दिली होतीत्यावरुन दिनांक 11.04.2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री इगळे साहेब यांनी राज्य परिवहन महामंडळ बुलढाणा यांचे कार्यालयातील दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणून उपलब्ध करुन घेवून आमचा आपसात परिचय करुन दिल्यानंतर पंचाना व मला पोलीस निरीक्षक इंगळे साहेब यांनी पडताळणी कार्यवाहीबाबत सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली त्याबाबत सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला आहे त्यानंतर दिनांक 11.04.2024 रोजी कार्यालयीन वेळ संपल्याने सदर प्रकरणात दिनांक 12.04.2024 रोजी पुढील कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले त्यानुसार आज दिनांक 12.04.2024 रोजी सकाळी मी काल दिलेल्या तक्रारीनुसार यातील लोकसेवक श्री मंगेश कुलथे यांची लोकसेवक श्री सचिन जैस्वाल, तहसिलदार सिंदखेडराजा यांचेकरिता लाच मागणी आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करणे असल्याने पोलीस निरीक्षक, सचिन इंगळे, तसेच सापळा पथक व दोन्ही पंच असे सिंदखेडराजा येथील जिजाऊ सृष्टी परिसरात हजर आले त्यावेळी मी सुध्दा इंगळे साहेब यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे जिजाऊ सृष्टी परिसरात कार्यवाही पथकाजवळ हजर आलो पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, यांनी मला व पंचाना पुन्हा पडताळणी पुर्व पंचनाम्यातील सुचनाची उजळणी करुन देवून लोकसेवक श्री कुलथे यांची लाचमागणी पडताळणी कार्यवाही करणे असल्याने मी इगळे साहेब यांचे सुचनेवरुन लोकसेवक कुलथे यांना फोन करुन भेटण्यास कोठे येवू याबाबत विचारणा केली असता लोकसेवक कुलथे यांनी मला तहसिल कार्यालय सिंदखेडराजा येथे भेटण्यास बोलाविल्याने सर्वानुमते लोकसेवक कुलथे (चालक) यांची सिंदखेडराजा तहसिल येथे लाच मागणी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले त्यानुसार इंगळे साहेबांनी माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टचे आतून बाहेरुन दिसणार नाही अश्याप्रकारे लटकावून दिले व पंच क्र.1 श्री विनोद मोरे यांचेसह माझे खाजगी कारने 10.30 वा तहसिल कार्यालय सिंदखेडराजाकडे रवाना केले त्यावेळी मी व पंच क्र. 1 असे आम्ही दोघे माझे खाजगी कारने तहसिल कार्यालय सिंदखेडराजा येथे जावून तहसिल कार्यालय परिसरात

कार पार्क करुन तहसिल कार्यालयात जात असतांना तहसिल कार्यालयाचे गेटजवळ लोकसेवक कुलथे व तहसिल कार्यालयातील शिपाई श्री ताठे हे उभे होते त्यावेळी मी, पंचास डोळयाचे इशाऱ्याने लोकसेवक कुलथे यांचेकडे इशारा करुन ते लोकसेवक कुलथे असल्याबाबत खुणविले त्यानंतर मी व पच असे त्यांचेजवळ गेलो त्यानंतर आम्ही सर्वजन तहसिल कार्यालयाचे गेटसमोर असलेल्या चहाचे हॉटेलमध्ये गेलो व त्याठिकाणी पंचासमक्ष आमच्यात रेती वाहतुकीसंबधाने बोलणी झाली त्यावेळी मी लोकसेवक श्री कुलथे याना म्हणालो की मी काय म्हणतो? तुम्ही ऐका एकदा कस आपूण तिथ आहे पहिल्यापासून सोबत, एकदा यायच्या देखता क्लिअर सागा कस आहे, त्यावेळी लोकसेवक कुलथे म्हणाले की तिथून यायच ट्रॅक्टर चालणार, ट्रॅक्टरन माल वर टाकणार, वरुन गाडी भरणार, यायन ट्रॅक्टरचे पैसे तिथ देणार, तिथून ट्रॅक्टर चालणार, त्यावेळी मी त्याना म्हणालो की, ट्रॅक्टरचे किती दयायचे ते पण सांगा, त्यावेळी लोकसेवक श्री कुलथे म्हणाले की पस्तीस हजार रुपये, असे म्हणून लोकसेवक कुलथे यानी माझेकडे अवैध रेती वाहतुक करु देण्याकरिता 335000/- रुपये लाचेची मागणी केली त्यावेळी लोकसेवक कुलथे याचे सोबत असलेले तहसिल कार्यालय सिंदखेडराजा येथील शिपाई श्री ताठे हे कुलथे याना म्हणाले की, तिस घ्यान त्यायचे, तिस घ्यान न ट्रॅक्टरचे असे म्हणून, लोकसेवक ताठे शिपाई यानी लोकसेवक कुलथे याना माझेकडून लाच रक्कम स्विकारावी याकरिता प्रोत्साहित केले त्यानंतर मी, पंच क्र.1 तसेच लोकसेवक कुलथे व शिपाई श्री ताठे असे आम्ही सर्वजन तहसिलदार यांचे केबीनमध्ये गेलो त्यावेळी आमच्यात पुन्हा रेती वाहतुकीसंबधाने बोलणी झाली त्यावेळी मी तहसिलदार साहेब याना म्हणालो की, नाही आपण निमगावच आपण सेच झालत न सर मले मंगेश दादाचा निरोप आला होता की मी साहेबाले बोललो म्हणी, त्यावेळी लोकसेवक जैस्वाल म्हणाले की, हाव त्यावेळी मी तहसिलदार साहेब यांना म्हणालो की, गावातले पाच ट्रॅक्टर आणी त्यायच्याबरोबर तुझ एक ट्रॅक्टर, अॅक्चुली माझेजवळ त्यावेळेस पैसे नव्हते सर, अन विनाकारण चॅट मारुन काय होत आपण म्हणल उदया तुम्हाले नाही दिले त मग त्या गोष्टीचा उहापोह होतो मी त्यायले (कुलथे याना) सांगीतल होत साहेब जे म्हणले मंगेश दादाल म्हणल साहेब जे म्हणले की ट्रॅक्टरचे एक भेटून जाईन बाकी गाडीचे मी काहीच देवून शकणार नाही महिनाक्शे बरोबर आहे का? एक महिनाभर फक्त, एक महिन्यानंतर मी दोन्ही गाडयाचे पण जे जगाचे असन त्याच्यापेक्षा लाज काज पाच दहा हजार कमी जास्त, त्यावेळी तहसिलदार जैस्वाल म्हणाले की ठिक आहे न काही हरकत नाही त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, फक्त मग ते ट्रॅक्टरच तुम्ही एकदा मग क्लीअर सांगा, त्यावेळी तहसिलदार जैस्वाल म्हणाले की, काय तुमच्या मनान, तुमच्या मनान काय करायच ते, त्यावेळी केबीनमध्ये हजर असलेले लोकसवेक कुलथे चालक म्हणाले की, ते सरांनी म्हणल न की, आपण एका रोडवर चाटे सरांनाच तो स्टॉक देवू बुवा, त्यावेळी तहसिलदार जैस्वाल म्हणाले की, चालन न करुन घ्या (मंगेश कुलथे यांना उददेशून) काही अडचन नाही, त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, ते जे काय असन ते तिस (हजार) असो की पस्तीस (हजार) असो मी यायच्याजवळ (मंगेश कुलथे यांचेकडे) पस्तीस हजार देवून टाकतो, त्यावेळी तहसिलदार जैस्वाल म्हणाले की, काही हरकत नाही, त्यावेळी मी त्यांना म्हणालो की तेवढ सर मले गाडी गीडीले तुमच्याकडून तकलीफ नाही झाली पाहिजे, त्यावेळी तहसिलदार जैस्वाल म्हणाले की काही हरकत नाही फक्त ते आपले जरा तलाठी गीलाठी आले की लोकेशनला राहू दया जरा, त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, मी आज मंगेश दादाजवळ करुन देतो, त्यावेळी तहसिलदार जैस्वाल म्हणाले की,चालन असे म्हणून लोकसेवक सचिन जैस्वाल तहसिलदार सिंदखेडराजा यांनी लोकसेवक कुलथे यांनी माझेकडे केलेल्या लाचमागणीस त्याची संमती असल्याचे स्पष्टोक्ती देवून लाच रक्कम 35000/- रुपये ही लोकसेवक कुलथे यांचेकडे देण्यास सांगीतल्याने मी व पंच क्र.1 असे कार्यवाही पथकाजवळ परत आलो त्यावेळी पोलीस निरीक्षक सचिन इंगळे यांनी माझेत व लोकसेवक श्री मंगेश कुलथे व लोकसेवक श्री सचिन जैस्वाल तहसिलदार तसेच लोकसेवक श्री पंजाबराव ताठे, शिपाई यांचेत लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकून लोकसेवक श्री मंगेश कुलथे पद चालक यानी माझ्याकडे 35000/- रुपये मागणी केली त्यादरम्यान सोबत असलेले तहसिल कार्यालयातील शिपाई श्री पंजाबराव ताठे यांनी लोकसेवक कुलथे याना माझेकडून लाच रक्कम स्विकारावी याकरिता प्रोत्साहित केले तसेच लोकसेवक श्री मंगेश कुलथे यांनी केलेल्या लाच मागणी लोकसेवक श्री सचीन जैस्वाल, तहसिलदार सिंदखेडराजा यानी समती देवून लाच रक्कम लोकसेवक कुलथे यांचेकडे देण्याचे सांगीतल्यबाबत खात्री केलीत्यानुसार सदर प्रकरणात आज दिनांक 12.04.2024 रोजीच सापळा कार्यवाही आयोजित करणे असल्याने पोलीस निरीक्षक श्री इगळे साहेब यांनी मला लोकसेवक श्री कुलथे यांचे लाच मागणी प्रमाणे त्याना देण्यासाठी 35000/- रुपये हजर करण्यास सांगीतले असता मी माझेजवळील 500/- रुपये दराच्या भारतीय चलनातील 70 नोटा असे एकुण 35000/-रुपये इंगळे साहेब यांचेकडे हजर केले त्यावेळी इंगळे साहेब यानी सापळा पथकातील सदस्याचे मदतीने सदर नोटांचे क्रमांक लिहून घेवून त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रकिया पुर्ण करुन सदर लाच रक्कम माझे शर्टाचे डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवून देवून मला व पंचाना सापळा कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना दिल्या त्यानंतर सदर प्रकरणात सर्वानुमते तहसिल कार्यालय सिंदखेडराजा येथे सापळा कार्यवाही आयोजित

करण्याचे ठरविण्यात आले त्यानुसार इंगळे साहेब यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्या गळ्यात लटकावून दिले त्यानंतर मला व पंच क्र.1 श्री मोरे यांना माझी खाजगी कारने तहसिल कार्यालय सिंदखेडराजा येथे 13.40 वा रवाना केले त्यावेळी आमचे पाठोपाठ इंगळे साहेब सापळा पथक व पंच क्र.2 श्री [illegible] असे शासकिय वाहनाने तहसिल कार्यालय सिंदखेडराजाकडे रवाना झाले त्यावेळी मी व पंच तसेच इंगळे साहेब व सापळा पथक असे तहसिल कार्यालय परिसरात पोहचलो त्यावेळी मी लोकसेवक श्री कुलथे यांना फोन करून मी तहसिल कार्यालय सिंदखेडराजा येथे आलो असल्याबाबत सांगितले असता कुलथे यांनी मला ते [illegible] वाहनात डिझेल भरण्यासाठी पेट्रोलपंपावर गेले असल्याबाबत सांगून थोड्या वेळात येतो असे सांगितल्याने मी व पंच तसेच सापळा पथक असे लोकसेवक कुलथे यांची वाट पाहत तहसिल कार्यालय सिंदखेडराजा समोर थांबून राहीलो त्यानंतर काही वेळाने लोकसेवक कुलथे हे तहसिल कार्यालय येथे आले असता मी व पंच असे त्यांचे जवळ जावून उभे राहीलो त्यावेळी आमच्यात पुन्हा रेती वाहतुकी संबधाने बोलणी झाली त्यावेळी मी कुलथे साहेब यांना म्हणालो की आपल्याला कुठे बाजुला बसायच का काय करायच देवून टाकू पैसे आणले होते घ्या, त्यावेळी लोकसेवक श्री कुलथे म्हणाले की, हा देवून दया न मग, त्यावेळी मी माझी शर्टचे डाव्या बाजुच्या खिशातील लाचेची रक्कम 35000/- रुपये उजव्या हाताने काढून लोकसेवक कुलथे यांचे समोर धरली असता कुलथे यांनी सदर लाच रक्कम स्वत व डाव्या हाताने स्विकारून स्वतःचे नेसलेल्या पॅन्टचे डाव्या बाजूच्या खिश्यात ठेवून दिले त्यावेळी मी कुलथे यांना म्हणालो की, तुम्ही म्हणल्यानुसार बरोबर पस्तीस हजार रुपये आहेत मोजुन घ्या असे म्हणून मी माझे डोक्यावरून उजवा हात फिरवून लाच रक्कम स्विकारले बाबतचा नियोजित इशारा केला असता पोलीस निरीक्षक श्री सचिन इंगळे व सापळा पथकातील सदस्य असे आमचे जवळ आले व त्यांनी लोकसेवक श्री मंगेश कुलथे यांना ताब्यात घेवून तहसिलदार श्री जैस्वाल यांचे केबीनमध्ये गेले व त्याठिकाणी पोलीस निरीक्षक इंगळे साहेब यांनी माझेकडून लाच रक्कम स्विकारले प्रकरणी लोकसेवक श्री सचिन जैस्वाल, तहसिलदार सिंदखेडराजा, लोकसेवक श्री मंगेश कुलथे, पद चालक, तसेच लोकसेवक पंजाबराव ताठे पद शिपाई तहसिल कार्यालय सिंदखेडराजा यांना ताब्यात घेवून झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा केलेला आहे आलोसे क्र.1 श्री सचिन शकरलाल जैस्वाल पद तहसिलदार, तहसिल कार्यालय सिंदखेडराजा यांनी दिनांक 12.04.2024 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान मला आरोपी क्र.2 श्री मंगेश कुलथे यांनी माझेकडे केलेल्या 35000/- रुपये लाच मागणीस संमती असल्याबाबत स्पष्टोक्ती देवून सदर लाच रक्कम मंगेश कुलथे, पद चालक, तहसिल कार्यालय सिंदखेडराजा यांचेकडे देण्यास सांगून मंगेश कुलथे यांना लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहित केले आलोसे क्र.2 श्री मंगेश शालीग्राम कुलथे पद चालक, तहसिल कार्य

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Bramhadev Sakharam Shelke(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

कार्यालय सिंदखेडराजा यांनी दिनांक 12.04.2024 रोजीचे पडताळणी कार्यवाही दरम्यान तहसिलदार श्री सचिन जैस्वाल यांना गैरमार्गाने आर्थीक लाभ पोहचावा या उददेशाने माझेकडे 35000/- रुपये लाचमागणी करुन दिनांक 12.04.2024 रोजीचे सापळा कार्यवाही दरम्यान 14.50 वा सुमारास तहसिल कार्यालय परिसरातील उपकोषागार कार्यालयाचे समोर लाच रक्कम 35000/- रुपये स्विकारली आहे. आलोसे क्र.3 श्री पंजाबराव तेजराव ताठे, पद शिपाई, तहसिल कार्यालय सिंदखेडराजा यांनी दिनांक 12.04.2024 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक कुलथे यांना माझेकडून लाच रक्कम स्विकारावी याकरिता प्रोत्साहित केले. तरी आलोसे क्र.1 श्री सचिन शंकरलाल जैस्वाल पद तहसिलदार तहसिल कार्यालय सिंदखेडराजा आलोसे क्र.2 श्री मंगेश शालीग्राम कुलथे पद चालक, तहसिल कार्यालय सिंदखेडराजा आलोसे क्र.3 श्री पंजाबराव तेजराव ताठे पद शिपाई, तहसिल कार्यालय सिंदखेडराजा यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद देत आहे.

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.ठाणे अंमलदार
सिंदखेड राजा पो.स्टे.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Bramhadev Sakhara
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):